admn17-18


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२०१७/ 2976

दि. सप्टेंबर,२०१७
07 SEP 2017

प्रति,

मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि.,
शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी,
रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड,
पुणे ४११ ०३८

**विषयः- श्री. सेवकभाऊ वाघाये पाटील कृषी महाविद्यालय, केसलवाडा वाघ, ता लाखणी, जि.भंडारा या महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया करण्याबाबत.**

संदर्भः- (१) कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे पत्र जा.क्र. कुस/ कावि-प्रवेश / ११९४/२०१७, दि. ७/८/२०१७.

(२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१८१७/१९६२ दि. ७/८/२०१७

कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांच्या दि. ७/८/२०१७ च्या पत्रास अनुसरून श्री. सेवकभाऊ वाघाये पाटील कृषी महाविद्यालय, केसलवाडा वाघ, ता लाखणी, जि.भंडारा या महाविद्यालयास प्रवेश प्रक्रियेतून वगळण्याबाबत या कार्यालयाच्या संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तथापि, कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र. कुस/ आदेश / आर-२१०/२०१७, दि. ४/९/२०१७ अन्वये उक्त महाविद्यालयाच्या सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील प्रवेश प्रक्रियेवरील स्थगिती आदेश रद्द करण्यात आलेले आहेत.

यास्तव आपणास सूचित करण्यात येते की, प्रवेशित उमेदवार वगळून राज्यस्तरीय गुणवत्ता यादी श्री. सेवकभाऊ वाघाये पाटील कृषी महाविद्यालय, केसलवाडा वाघ, ता लाखणी, जि.भंडारा या महाविद्यालयास उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच सदर महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत या यादीतील उमेदवारांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करावे. याचबरोबर संकेतस्थळावर सदरचे पत्र उपलब्ध करून देण्यात यावे.

**मा.महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

Sakde

**संचालक (शिक्षण)**

प्रत कार्यवाहीसाठीः-

१. प्राचार्य, श्री. सेवकभाऊ वाघाये पाटील कृषी महाविद्यालय, केसलवाडा वाघ, ता लाखणी, जि.भंडारा

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी मे. केटीपीएल, पुणे यांचेकडून गुणवत्ता यादी प्राप्त करून घ्यावी व सदर यादीच्या आधारे आणि पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील नियम व कार्यपध्दती विचारात घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली दि. ११ ते १५ सप्टेंबर,२०१७ या कालावधीत महाविद्यालयाच्यास्तरावर महाराष्ट्र कोटा, विद्यापीठ कोटा आणि व्यवस्थापन कोटयाची प्रवेश प्रक्रिया राबवावी. प्रवेशित विद्यार्थ्यांचा सविस्तर तपशील (प्रवेश अर्ज क्रमांक, नाव, प्रवर्ग, प्रवेश दिल्याचा प्रवर्ग, गुणवत्ता इत्यादी) कृषी परिषद कार्यालयास सादर करण्यात यावा.

२. कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

यांना सूचित करण्यात येते की, कृषी विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली उक्त महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी व पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.